| **MHLA130010052019** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | : | १९.११.२०१९ | | |
| | नोंदणी दिनांक | : | १९.११.२०१९ | | |
| | निकाली दिनांक | : | १३.०५.२०२६ | | |
| | कालावधी | : | **व.** | **म.** | **दि.** |
| | | | **०६** | **०५** | **२४** |

**न्यायदंडाधिकारी वर्ग १ (न्यायालय क्र.१) रेणापूर ता.रेणापूर जि. लातूर यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी श्रीमती पी.ए.आपटे)**

**संक्षीप्त फौजदारी खटला क्र.४०७/२०१९**
**(निशाणी क्र.१३ लगत )**

(रेणापूर पोलीस स्टेशन,गु. र. नं.१९५/२०१९, भा.द.वि.कलम २७९, ४२७ अन्वये)

| | | |
|---|---|---|
| अभियोगपक्ष | – | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस निरीक्षक, रेणापूर पोलीस स्टेशन |
| अभियोगपक्षातर्फे | – | श्री. डी.बी.सारुळे सहा. सरकारी अभियोक्ता. |
| तक्रारदार | – | **मेहरखान दस्तगीर पठाण,**<br>वय– ४१ वर्ष, धंदा– चालक,<br>रा. साई, ता.जि. लातूर. |
| आरोपी | – | **१. नागु उर्फ नागनाथ सटवाजी खाटीक**<br>वय –३७ वर्ष, धंदा –चालक,<br>रा.वडगाव (दादाहरी), ता.परळी,जि.बीड. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | – | श्री.डी.पी.नागरगोजे. |
| गुन्हा घडल्याची तारीख | – | दि.०४.०५.२०१९ |
| प्रथम खबरची तारीख | – | दि.०४.०५.२०१९ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | – | दि.१३.११.२०१९ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | – | दि.१३.१२.२०१९ |
| पुरावा आरंभ केल्याची तारीख | – | दि.०४.११.२०२४ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची तारीख | – | नाही. |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णय घोषित केल्याची तारीख | – | दि.१३/०५/२०२६ |
| शिक्षा असल्यास, आदेशाचा दिनांक | – | नाही. |

## (आरोपीचा तपशिल)

| .क्र. | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप | शिक्षा दिली किंवा निर्दोष सोडले | दिलेली शिक्षा | फौ.प्र.सं.कलम ४२८ करीता संपरिक्षेदरम्यान तुरुंगात असल्यास तो कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **नागु उर्फ नागनाथ सटवाजी खाटीक** | १३.११.२०१९ | १३.११.२०१९ | भा.द.वि.कलम २७९, ४२७ अन्वये | निर्दोष सोडले | नाही. | नाही. |

### (अभियोग पक्षाचे साक्षीदारांची यादी)

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | साक्षीदाराची भुमीका |
|---|---|---|
| सा.क्र.१ | मेहरखान दस्तगीर पठाण | फिर्यादी |

### (अभियोग पक्षाचे कागदपत्रे )

| अ.क्र. | नि.क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | १५ | फिर्याद |

### (आरोपी पक्षाचे कागदपत्रे )

| अ.क्र. | नि.क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | नाही. | नाही. |

## <u>न्या य नि र्ण य</u>

(दिनांक १३/०५/२०२६ रोजी अधिघोषित)

सदरच्या खटल्यामध्ये आरोपीविरुध्द भा.द.वि.कलम २७९, ४२७ अन्वये दोषारोप ठेवण्यात आलेले आहेत.

**<u>सरकार पक्षाची फिर्याद थोडक्यात खालील प्रमाणे –</u>**

०२. दि.०४.०५.२०१९ रोजी ४.०० वाजताच्या सुमारास फिर्यादी मेहरखान पठाण यांनी ते चालवित असलेला टँकर क्र.एम.एच.०४/एफ–५४३५ हा बिघडल्याने रेणापूर लातूर रोडवर महापूर पाटीजवळ रोडचे साईडला उभा केलेले असताना रेणापूरकडून लातूरकडे जाणाऱ्या टिप्पर क्र.एम.एच.४४/यू–००९७ चा चालक आरोपी नागनाथ खाटीक याने सदर टँकरला जोराची धडक दिल्याने तो पलटी होवून बाजूच्या खडयात पडला. त्यामुळे सदर टँकरचे अंदाजे रु.३,००,०००/– चे नुकसान झाले. त्यामुळे फिर्यादीने वाहन चालकाविरुद्ध प्रस्तुतची तक्रार दाखल केली.

०३. पोलिस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीप्रमाणे आरोपीविरोधात भारतीय दंड विधान कलम २७९,४२७ अन्वये गुन्हा रजिस्टर नंबर १९५/२०१९ नोंदविण्यात आला. त्याप्रमाणे तपासी अंमलदार यांनी गुन्ह्याचा तपास केला असता तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. तसेच साक्षीदारांचे जबाब नोंदविले आणि गुन्ह्याचा तपास पुर्ण झाल्यानंतर तपासी अधिकारी यांनी न्यायालयात आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले.

०४. माझे पूर्वअधिकारी यांनी आरोपींविरोधात भारतीय दंड विधान कलम २७९,४२७ अन्वये नि.क्र.१३ लगत दोषारोप निश्चित करुन नोंदविले आणि ते आरोपीला समजावुन सांगितले. आरोपीने गुन्हा नाकबुल करुन न्यायालयाला केस चालविण्याची विनंती केली. त्यानंतर सरकार पक्षाने साक्षीदार क्र.१ – फिर्यादी मेहरखान दस्तगीर पठाण (नि.क्र.१३ लगत) यांना तपासले. वारंवार संधी देवूनही सरकार पक्षातर्फे इतर साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली नसल्यामुळे नि.क्र.१ वरील आदेशानुसार सरकारी पक्षाचा पुरावा

बंद करण्यात आला. आरोपीचे फौजदारी प्रक्रीया संहीता कलम ३१३ नुसार निवेदन नि.१३ वर नोंद करण्यात आले.

०५. सरकार पक्षाचे आरोपीविरुद्धचे आरोप पाहता खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले आहेत, त्यावरील कारणांसहित निष्कर्ष त्यांच्यासमोर दिलेले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.०४.०५.२०१९ रोजी दुपारी ४.०० वाजताच्या सुमारास रेणापूर ते लातूर रोडवर, महापूर पाटीजवळ आरोपीने त्याचे ताब्यातील टिप्पर क्र.एम.एच.४४/यू–००९७ अविचाराने, हयगयीने, रस्त्याची विशिष्ट परिस्थिती लक्षात न घेता चालवून टँकर क्र.एम.एच.०४/एफ–५४३५ याला धडक देवून अपघात केला आणि भारतीय दंड विधान कलम २७९ अन्वये गुन्हा केल्याचे सरकार पक्षाने हे सिद्ध केले आहे काय ? | ...नाही. |
| २. | उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद वाहन अविचाराने, हयगयीने, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगात चालवुन टँकर क्र.एम.एच.०४/एफ–५४३५ याला धडक देवून फिर्यादीच्या टँकरचे नुकसान केले आणि भारतीय दंड विधान कलम ४२७ अन्वये गुन्हा केल्याचे सरकार पक्षाने हे सिद्ध केले आहे काय ? | ...नाही. |
| ३. | अंतिम आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |

## -: का र ण मि मां सा :-

**मुद्दा क्रमांक १ व २ बाबत:-**

०६. सरकारी पक्षाचे असे कथन आहे की, दि.०४.०५.२०१९ रोजी ४.०० वाजताच्या सुमारास फिर्यादी मेहरखान पठाण यांनी ते चालवित असलेला टँकर क्र.एम.एच.०४/एफ-५४३५ हा बिघडल्याने रेणापूर लातूर रोडवर महापूर पाटीजवळ रोडचे साईडला उभा केलेले असताना रेणापूरकडून लातूरकडे जाणाऱ्या टिप्पर क्र.एम.एच.४४/यू-००९७ चा चालक आरोपी नागनाथ खाटीक याने सदर टँकरला जोराची धडक दिल्याने तो पलटी होवून बाजूच्या खडयात पडला. त्यामुळे सदर टँकरचे अंदाजे रु.३,००,०००/- चे नुकसान झाले व त्यायोगे भादवी कलम २७९, ४२७ अन्वये गुन्हा केला. त्यामुळे सरकार पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या सर्व साक्षीदारांचे पुराव्याचे अवलोकन करणे गरजेचे आहे.

०७. सरकार पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र.१ फिर्यादी मेहरखान दस्तगीर पठाण याच्या पुराव्यात असे आले आहे की, ते बलभिम जाधव यांचे पाण्याचे टँकर क्र. एम.एच.०४/ एफ-५४३५ वर चालक म्हणून काम करत होते. घटना दि.०४.०५.२०१९ रोजी पहाटे ४.०० वाजण्याच्या सुमारास महापूर पाटीजवळ लातूर ते रेणापूर रोडवर घडली. त्यावेळी ते चालवत असलेली वर नमूद गाडी बिघडली असल्यामुळे बाजूला लावून झोपले होते. त्यावेळी आरोपी स्वतःचे ताब्यातील वाहन टिप्पर क्र. एम.एच.४४/यू-००९७ हे चालवत येवून त्याचे वर नमूद गाडीला पाठीमागून धडक दिली. त्यामुळे त्याची गाडी खडयात पडली. त्यामुळे त्यांचे गाडीचे चेसीस वाकले, केबीन शो पूर्णपणे वाकले. तसेच टँकरची टाकी पूर्णपणे दबून फुटली. त्यामुळे अंदाजे तीन लाखाचे

नुकसान झाले. त्यानंतर त्यांनी गाडी मालकास फोनवर कळविले. पोलीस घटनास्थळी आले. त्यानंतर त्यांनी तक्रार दिली. सदर साक्षीदाराने उलटतपासा दरम्यान हे कबूल केले आहे की, घटना घडली त्यावेळी रस्त्याचे काम चालु होते. रस्त्याचे काम चालु असल्यामुळे वाहनांची वर्दळ एकाच बाजूने चालू होती. विमा कंपनीकडून भरपाई मिळावी याकरीता गाडी मालकाच्या सांगण्यावरुन फिर्याद दिली आहे. फिर्याद गाडीच्या मालकाने तयार केली, त्यावर त्याने सही केली. गाडीच्या मालकाने फिर्याद दयायला सांगितल्यामुळे फिर्याद दिली.

०८. सरकारपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या वरील साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता सदर साक्षीदाराने फिर्याद गाडीच्या मालकाने तयार केली व त्यावर त्याने सही केली ही सुचना मान्य केली आहे. त्यामुळे फिर्याद निःशंकपणे सिध्द झाली असे म्हणता येणार नाही. सरकार पक्षातर्फे अन्य साक्षीदार तपासण्यात आलेले नाहीत. तसेच गाडीच्या नुकसानीबाबत देखील कोणतीही कागदपत्रे शाबीत करण्यात आली नाहीत अथवा साक्षीदार तपासण्यात आलेले नाहीत. सरकार पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदाराची साक्ष पाहता दि.०४.०५.२०१९ रोजी दुपारी ४.०० वाजण्याचे सुमारास आरोपीने त्याचे ताब्यातील टिप्पर क्र.एम.एच.४४/यू–००९७ भरधाव वेगात, हयगई व निष्काळजीपणे चालवून फिर्यादीचे टँकरला धडक देवून अपघात केला टँकरचे नुकसान केले हे सिध्द होत नाही. त्यामुळे सरकारपक्ष आरोपीविरुध्द भादवी कलम २७९, ४२७ अन्वये गुन्हा सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे अशा मतास मी येत आहे. यास्तव मी मुद्दा क्र. १ व २ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविते.

**<u>मुद्दा क्र.३ करीता</u> –**

०९. मुद्दे क्र. १ ते २ चे नकारार्थी उत्तरामुळे आरोपी हा भारतीय दंड विधान कलम

२७९, ४२७ अन्वये निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरलेला आहे. या निष्कर्षासह मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर समर्थनार्थ खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) अनुसार भारतीय दंड विधान संहिता कलम २७९,४२७ प्रमाणे गुन्हा केल्याचे आरोपांमधुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका व जामीन न्यायालयाच्या स्वाधीन करण्यात येतो.

३. आरोपीने प्रत्येकी फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम ४३७–अ अन्वये रक्कम रु. १५,०००/– चा वैयक्तीक जातमुचलका व जामीन कदबा द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत.)

Digitally signed by POOJA ANAND APTE
Date: 2026.05.13 15:22:09 +0530

**ठिकाण–रेणापूर**
दिनांक: १३/०५/२०२६

**( पी.ए.आपटे )**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, रेणापूर**